22-01-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01/21/2025 11:30 PM Page 1



## निवडक

### सावर्डेत प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

काकोडा, दि. २१ : सावर्डे जिमखाना स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लब, गोवा कोकणी अकादमी आणि शारदा इंग्लिश हायस्कूल सावर्डे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला २५ रोजी दुपारी ३.३० वाजता शारदा सभागृह, सावर्डे येथे होणार असून यामध्ये स्वर उत्सव या विशेष कोकणी गायन कार्यक्रमासह युती सावर्डेकर यांच्या नवीन कोकणी गाण्याचे विमोचन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई, सावर्डेचे आमदार गणेश गावकर, कुडचडेचे आमदार नीलेश काब्राल, गोवा क्रिकेट असोसिएशनचे सचिव रोहन देसाई, सावर्डे पंचायत सरपंच सौ. चिन्मयी नाईक, गोवा कोकणी अकादमीचे अध्यक्ष श्री. वसंत सावंत तसेच सावर्डे पंचायत सदस्य सिद्धी पाऊस्कर आणि संजय नाईक उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात सावर्डे व कुडचडे भागातील मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार असून, सुप्रसिद्ध लेखक रणजित काकोडकर यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. तसेच नामांकित कलाकार बंटी उडेलकर आणि लेखक प्रशांत नाईक यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. स्वर उत्सव या विशेष कोकणी संगीत महोत्सवात युती सावर्डेकर, दीत्या शिरवईकर आणि कृष्णकन्हैया कालेकर हे गायक कोकणी गाणी सादर करणार असून, त्यांना विशाल फातर्पेकर, नेहाल काणे आणि मिलिंद साखरदांडे यांची संगीत साथ लाभणार आहे.
या कार्यक्रमात युती सावर्डेकर यांच्या नवीन कोकणी गाण्याचे प्रकाशन होणार असून, याचे गायक युती सावर्डेकर, संगीतकार आणि गीतकार अक्षय प्रकाश नाईक, सिनेमॅटोग्राफी उद्धव केरकर आणि संकल्पना व लेखन श्री. रणजित काकोडकर यांचे आहे. संध्याकाळी ३.३० वाजता अखिल आणि पातळीवरील रांगोळी व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, चित्रकला स्पर्धा दोन वयोगटांत – ५ ते १० वर्षे आणि ११ ते १५ वर्षे – घेण्यात येणार आहे. रांगोळी स्पर्धा केवळ सांगे व केपें तालुक्यापुरती मर्यादित असेल. चित्रकला स्पर्धेसाठी ८ तर रांगोळी स्पर्धेसाठी ६ बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धांसाठी नावनोंदणीसाठी ९२७१६७४०९६ या क्रमांकावर संपर्क साधावा. सावर्डे आणि परिसरातील रसिक प्रेक्षकांसाठी हा एक अनोखा संगीत व सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे.

---

### कोलवा येथे धीरयो आयोजित केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २१ : कोलवा येथे मच्छीमार खात्याच्या विरुद्ध बाजूला असलेल्या शेतात धीरयो आयोजित केल्याप्रकरणी कोलवा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. कोलवा पोलीस स्थानकाच्या जवळच असलेल्या शेतात या धीरयो आयोजित करण्यात आल्या होत्या. धीरयो पाहण्यासाठी बरीच गर्दी जमल्याचे ही सामाजिक माध्यमांवर पसरलेल्या व्हिडिओत दिसून येत आहे. हाकेच्या अंतरावर असलेल्या या धीरयो बिनबोबाट पार पडल्याने कोलवा पोलीस लक्ष होऊ लागले आहेत. त्यामुळे 'बैल गेला आणि झोपा केला' असे म्हटले जाऊ लागले आहे. धीरयो बिनदिक्कत पार पडल्याने लक्ष होऊ लागल्याने आता कोलवा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, जॉयल फर्नांडिस व फिलीप कॅ्वीन रोड्रीग्स या दोघांचा समावेश आहे. सार्वजनिक मनोरंजनासाठी दोन बैलांच्या धीरयो आयोजित करून त्यांना धोका पोहोचवल्याप्रकरणी पोलिसांनी या दोघांविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधात्मक कायद्याखाली गुन्हा नोंदवला आहे. दोघांना ही अटक करून वैयक्तीक हमीवर त्यांची सुटका करण्यात आली. याप्रकरणी कोलवा पोलीस स्थानकाच्या उपनिरीक्षक रक्षा नाईक अधिक तपास करीत आहेत.

---

### वॉट्सपवरून संपर्क करून पोलिस असल्याची बतावणी करून महिलेचे २.२० लाख रुपये लाटले

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २१ : वॉट्स पवरून संपर्क करून पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून एका महिलेचे २ लाख, २० हजार, ९६८ रुपये लाटल्याप्रकरणी फातोर्डा पोलिसांनी महाराष्ट्रील तिघांना अटक केली आहे. फैझल शेख (२१ वर्षे, काद्री मशीद, मालाड, महाराष्ट्र), अमित वाघेला (मालाड, मुंबई, महाराष्ट्र) या दोघांना अटक केल्यानंतर त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून फातोर्डा पोलिसांनी विजय विष्णोई (२४ वर्षे, ठाणे, महाराष्ट्र) या मुख्य संशयिताला अटक केली. तो फेडरल बँकेचे अकाऊंट व्यवस्थापन पाहत होता. याप्रकरणी फातोर्डा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैशाली भोसले (फातोर्डा) या महिलेने याप्रकरणी फातोर्डा पोलीस स्थानकात तक्रार केली होती. त्यात म्हटले आहे की, दोघांनी तोतया पोलीस अधिकारी बनून व गणवेश परिधान करून आपल्याला वॉट्स पवरून संपर्क साधला. आधार कार्डच्या शेवटच्या चार क्रमांकाची पडताळणी केली व आपण 'मनी लॉंडरींग' व इतर कित्येक गुन्हेगारी प्रकरणात गुंतले असल्याचे सांगून २ लाख, २० हजार, ९६८ रुपये फेडरल बँकेच्या मालाड येथील शाखेच्या अकाऊंटमध्ये जमा करायला सांगितले. त्यानंतर संगणक साधने वापरून आपली फसवणूक केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी फातोर्डा पोलिसांनी प्रथम फैझल शेख व अमित वाघेला या दोघांविरुद्ध गुन्हा नोंद करून अटक केली. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून विजय विष्णोई या मुख्य संशयित आरोपीला अटक केली. याप्रकरणी फातोर्डा पोलीस स्थानकाचे निरीक्षक नाथन दी आल्मेदा अधिक तपास करीत आहेत.

# नगरपरिषद घेणार ३८ वर्षांपूर्वीच्या शौचालयाचा शोध

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. २१ :** बिल्डरने इमारत बांधकामासाठी घेतलेल्या भूखंडावर ३८ वर्षांपूर्वी एक दोन आसनी शौचालय होते का ? याचा शोध घेण्याचे काम आता फोंडा नगरपरिषदेला लागले आहे. याला कारणही तसेच आहे. १९८६ मध्ये बांधलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या गूढतेवरून स्थानिक आणि फोंडा नगरपरिषद (पीएमसी) यांच्यात संघर्ष झाल्याने वारखंडमध्ये वाद निर्माण झाला आहे . संबंधीत जागेवर दोन आसनी शौचालय ब्लॉक असल्याचा दावा स्थानिक नागरिकाने केला असला तरी पीएमसीच्या नोंदींमध्ये त्याच्या बांधकामाचा किंवा अस्तित्वाचा कोणताही पुरावा आढळत नाही, असे पीएमसीच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

एका बांधकाम व्यावसायिकाने इमारत बांधण्यासाठी नगर नियोजन (टीसीपी) विभागाकडे परवानगी मागितली तेव्हा या भूखंडाबाबत वाद आणखी वाढला. यामुळे स्थानिक रहिवासी सुदेश नाईक यांनी आक्षेप घेतला आणि असा दावा केला की ही जमीन पूर्वी सार्वजनिक शौचालयासाठी देण्यात आली होती आणि ती सार्वजनिक वापरासाठी पीएमसीच्या अधिकारक्षेत्रात राहिली पाहिजे.वाद सोडवण्यासाठी, नगरपालिका अभियंता विशांत नाईक यांच्या नेतृत्वाखाली पीएमसी अधिकाऱ्यांनी जागेची तपासणी केली आणि जेसीबी मशीन वापरून जागेचे उत्खनन सुरू केले. जुन्या संरचनेचे कोणतेही अवशेष शोधण्याचा प्रयत्न करूनही, शौचालय ब्लॉकच्या पायाचे कोणतेही पुरावे सापडले नाहीत, असे पीएमसी अधिकाऱ्यांनी सांगितले.

तक्रारी मिळाल्यानंतर आम्ही जागेची तपासणी केली. तथापि, रेकॉर्ड किंवा प्रत्यक्ष जागेवर सार्वजनिक शौचालयाचा कोणताही पुरावा दिसत नाही, असे विशांत नाईक म्हणाले. तथापि, स्थानिक रहिवासी सुदेश नाईक यांनी जुनी छायाचित्रे आणि कागदपत्रे सादर केली, ज्यात हा भूखंड मूळ मालकाने नगरपरिषदेला शौचालय बांधणीसाठी बक्षीसपत्र करून दिल्याचा समावेश आहे. देखभालीअभावी शौचालय कालांतराने कोसळल्याचा आरोप त्यांनी केला आणि २००५ पासून पीएमसीला सादर केलेली पत्रे देखील सुदेश नाईक यांनी दाखवली, ज्यात दुरुस्तीची विनंती केली होती. नाईक यांनी असा दावा केला की, जेव्हा घरगुती शौचालये फारशी नव्हती तेव्हा रहिवासी या जागेचा मोठ्या प्रमाणात वापर करत होते.

उत्खननादरम्यान, नाईक यांनी जुने लॅटराइट दगड दाखवले आणि ते शौचालयाच्या पायाचे अवशेष असू शकतात असा दावा केला. जमीन परत मिळवण्यासाठी आणि ती सार्वजनिक कारणांसाठी वापरली जात आहे याची खात्री करण्यासाठी विशेष तपास पथकाने या प्रकरणाची चौकशी करावी. मुख्य अधिकाऱ्यांनी गहाळ नोंदी आणि कागदपत्रांबाबत तक्रार देखील दाखल करावी, अशी मागणी त्यांनी केली. नाईक यांनी पीएमसीला जमीन परत मिळवण्यासाठी जलद कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. शौचालय ब्लॉक पुन्हा बांधून समुदायाला फायदा होऊ शकतो असे सुचवले आहे. त्यांनी संरचनेशी संबंधित अधिकृत नोंदी गायब झाल्याची सखोल चौकशी करण्याची मागणी देखील केली आहे.

## आमदार निधीतले १५० कोटी अखर्चित !

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१ :** गेल्या तीन वर्षांत, आमदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत आमदारांनी त्यांच्या हक्काच्या ३०० कोटी रुपयांच्या निधीतून सुमारे १५० कोटी रुपये अखर्चित ठेवल्याचे आढळून आले आहे. दुसरीकडे चार आमदारांनी त्यांच्या मतदारसंघातील विविध विकासकामांवर त्यांची कमाल खर्चाची मर्यादा ओलांडली आणि एकत्रितपणे ४.२९ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केले. ही रक्कम आता त्यांच्या पुढील वार्षिक मंजुरीमध्ये समायोजित केली जाईल.

आमदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत आमदारांना दरवर्षी मंजूर झालेले २.५ कोटी रुपयांचे प्रकल्प मिळू शकतात. राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीने जाहीर केले आहे की जोपर्यंत कमाल मर्यादा मंजूर करण्यासाठी उपलब्ध नाही तोपर्यंत योजनेअंतर्गत कोणतेही अतिरिक्त काम प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. २०२२ पासून, जेव्हा योजना अधिसूचित करण्यात आली तेव्हापासून ४० मतदारसंघांमध्ये एकूण ३०० कोटी रुपये वाटप करण्यात आले. प्रत्येक मतदारसंघाला एकूण ७.५० कोटी रुपये वाटप करण्यात आले आहे.

आकडेवारीनुसार, एकूण ३०० कोटी रुपयांपैकी १४९ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे, ज्यामध्ये वाळपई (१.४८ कोटी), डिचोली (१.८८ कोटी), वेळ्ळी (७६ लाख) आणि मडकई (१७ लाख) या मतदारसंघांनी कमाल मर्यादेपेक्षा जास्त खर्च केलेले ४.२९ कोटी रुपये समाविष्ट आहेत. या मतदारसंघांसाठी मंजूर केलेली एकूण कामे ३४.३० कोटी रुपये आहेत.

या मतदारसंघांनी त्यांच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च केला असला तरी, वास्को आणि दाबोळी सारख्या मतदारसंघांनी योजनेअंतर्गत एकही प्रस्ताव सादर केलेला नाही आणि प्रत्येकी ७.५० कोटी रुपये खर्चित राहिले . खासदार–एलएडी प्रमाणेच सुरू केलेली आमदार–एलएडी योजना ही एक योजना आहे जी निवडून आलेल्या प्रतिनिधींना पिण्याचे पाणी, प्राथमिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि रस्ते यासारख्या क्षेत्रातील मालमत्ता आणि सुविधा निर्माण करण्यासाठी विकासकामांची शिफारस करण्यास सक्षम करण्यासाठी स्थापन करण्यात आली होती.आमदारांनी मागणी पाठवल्यानंतरच राज्य सरकारकडून आमदार–एलएडी निधी जारी केला जातो. एकदा ते पूर्ण झाले की, कामे अंमलात आणण्यासाठी निधी जिल्हा प्रशासनाला वाटप केला जातो.

आमदार क्षेत्र विकास योजनेअंतर्गत सावर्डे (७.२७ कोटी), कुंकळ्ळी (६.७३ कोटी), सांगे (६.२२ कोटी), मये (६.१८ कोटी), साळगाव (६.१७ कोटी), साखळी (५.१३ कोटी) आणि कुंभारजुआ (५.१३ कोटी) या मतदारसंघांनी निधीचा जास्तीत जास्त वापर केला आहे. तर प्रियोळ (३ लाख), केपे (२७ लाख), थिवि(९६ लाख), कुडाळी (६८ लाख), पर्ये (१.९२ कोटी) आणि नावेली (२.५० कोटी) हे मतदारसंघ निधीचा सर्वात कमी वापर करणारे मतदारसंघ ठरले आहेत.

## रोमी लिपीच्या मान्यतेबाबत ग्लोबल कोंकणी फोरमचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१ :** जर अधिकृत भाषा कायद्याअंतर्गत रोमन लिपीला समान दर्जा देण्याचा ठराव विधानसभेत मंजूर झाला नाही तर कायदेशीर कारवाईचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशारा ग्लोबल कोंकणी फोरमने (जीकेएफ) सरकारला दिला आहे

याबाबत जीकेएफचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रो. अँटोनियो अल्वारेस यांनी रोमन लिपीला न्याय मिळवून देण्यासाठी फोरमच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. आमचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत रोमी लिपीच्या योग्य स्थानासाठी आमचा लढा अथकपणे सुरू राहील, असे अल्वारेस यांनी जाहीर केले.

रोमी लिपिला समान दर्जा मिळावा यासाठी दोन वर्षांहून अधिक काळ प्रयत्न करणाऱ्या फोरमने रोमन लिपीविरुद्ध भेदभाव करणे भारतीय संविधानाचे उल्लंघन करते यावर भर दिला. संविधान लिपीवर आधारित भेदभावाला परवानगी देत नाही आणि सरकार गोव्यात रोमन लिपीच्या व्यापक वापराकडे दुर्लक्ष करू शकत नाही, असे अल्वारेस यांनी ठामपणे सांगितले.

फोरममधील अलिकडेच फूट पडल्याबद्दल विचारले असता अल्वारेस यांनी स्पष्ट केले की, सदस्यांचा एक गट नवीन संघटना स्थापन करण्यासाठी निघून गेला आहे. तथापि, त्यांनी असे म्हटले की यामुळे जीकेएफ च्या धोरणांवर परिणाम होणांर नाही.

जीकेएफचे सचिव जोस साल्वाडोर फर्नांडिस यांनी फोरमच्या उत्पत्तीबद्दल अंतर्दृष्टी प्रदान केली आणि संघटनेच्या स्थापनेच्या प्रयत्नांचे नेतृत्व केल्याबद्दल डोमनिक फर्नांडिस यांना श्रेय दिले. दोन वर्षांपूर्वी पायाभूत काम सुरू झाले, मे २०२४ मध्ये फोरमची अधिकृत स्थापना झाली. गेल्या सहा महिन्यांत, आमच्या सदस्यांनी आम्हाला या टप्प्यावर आणण्यासाठी अथक परिश्रम केले आहेत, असे फर्नांडिस म्हणाले.

यापूर्वी, २०२५–२०२७ च्या कार्यकाळासाठी कार्यकारी समिती निवडण्यासाठी आयोजित बैठकीत फोरमने अँटोनियो अल्वारेस यांना अध्यक्ष म्हणून आणि फ्रान्सिस झेवियर फर्नांडिस यांना उपाध्यक्ष म्हणून निवडले.

### शाळांमध्ये रोमन लिपी कोंकणीचा वापर करण्याची मागणी

**जीकेएफ मधून बाहेर पडून नवीन संघटना स्थापन करणाऱ्या जागतिक रोमी लिपी अभियान (जीआरएलए) ने नवीन शिक्षण धोरण (एनईपी) २०20 द्वारे प्रदान केलेल्या चौकटीचा वापर करून शाळांमध्ये रोमन लिपी कोंकणीचा वापर करण्याबाबत चर्चा करण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन आमदारांना केले आहे. भाषिक विविधता जपण्यावर एनईपीच्या भरावर प्रकाश टाकत, जीआरएलएचे अध्यक्ष केनेडी अफोंसो यांनी गोवा सरकारला शालेय अभ्यासक्रमात रोमन लिपी कोंकणीचा समावेश करण्याचे आवाहन केले. एनईपी युनेस्कोने धोक्यात आलेली भाषा म्हणून वर्गीकृत केलेल्या कोंकणीचे रक्षण करण्याची एक महत्त्वपूर्ण संधी प्रदान करते, असे अफोंसो म्हणाले.जीआरएलएने यावर भर दिला की भारतीय संविधानाच्या कलम २९(१) द्वारे अल्पसंख्याकांच्या भाषा, लिपी आणि संस्कृती जपण्याच्या अधिकारांचे रक्षण केले जाते, ज्यामुळे त्यांच्या मागणीला आणखी बळकटी मिळते. एनईपीच्या तरतुदी कागदावर न राहता कृतीयोग्य धोरणांमध्ये रूपांतरित होतील याची खात्री करून, निर्णायकपणे कृती करण्याचे आवाहन अफोंसो यांनी सरकारला केले.**



## डिचोली नगराध्यक्षपदी विजयकुमार नाटेकर यांची निवड निश्चित

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ **एकच उमेदवारी अर्ज सादर : आज अधिकृत घोषणा**

**डिचोली, दि. २१ :** डिचोली नगराध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते विजयकुमार नाटेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाला असून मुख्यमंत्री प्रदेशाध्यक्ष व आमदार तसेच सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

त्यानंतर त्यांनी नगरपालिकेत मुख्याधिकारी सचिन देसाई यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज सादर केला त्यामुळे त्यांची निवड निश्चित झाली असून आज बुधवारी सकाळी ११ वाजता अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे.

मंगळवारी सकाळी मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत, भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक आमदार डॉक्टर चंद्रकांत शेटये,भाजप मंडळ अध्यक्ष डॉक्टर कौस्तुभ पाटणेकर, माजी अध्यक्ष विश्वास गावकर सर्व नगरसेवक यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेताच डिचोली नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाच्या नावाची घोषणा करण्या साठी प्रदेशाध्यक्ष या नात्याने मुख्यमंत्री व आमदारांच्या सहकार्याने अध्यक्ष दामू नाही यांनी जबाबदारीने भूमिका पार पाडताना सर्व संमतीने भाजपचे कार्यकर्ते विजयकुमार नाटेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करून आपली पहिलीच परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण होण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

अर्थात हा निर्णय मुख्यमंत्री डॉक्टर सावंत आमदार डॉक्टर शेटये मंडळ अध्यक्ष यांच्या संमतीने झालेला आहे मात्र त्यात दामू नाईक यांची भूमिका ही तितकीच महत्त्वाची मानली जाते.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी विजयकुमार नाटेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या दामू नाईक यांनीही विजय नाटेकर यांचे अभिनंदन करताना पालिका क्षेत्रात उत्तम काम करीत असताना पक्षाचे कार्यही वाढवण्याचे आवाहन केले.

डॉक्टर चंद्रकांत शेटये यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

विजयकुमार नाटेकर यांनी आपल्या नावाची शिफारस झाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना गेले अनेक वर्षे भारतीय जनता पक्षाचे काम प्रामाणिकपणे आपण करीत आलेलो असून नगराध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर त्या पदाला न्याय देण्यासाठी सर्व ते प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरण निसर्ग व गोधन यांचे रक्षण करण्यासाठी आपण विशेष लक्ष देणार असल्याचे सांगितले तसेच मुख्यमंत्री व सर्वांना विश्वासात घेऊन शहरातील विकासाला चालना देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



## लोलये ग्रामसभेत फिल्म सिटीला विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. २१ :** लोलये येथील भगवती पठारावरील नियोजित फिल्म सिटीला लोलये पंचायतीच्या गेल्या रविवारी झालेल्या ग्रामसभेत उपस्थित नागरिकांनी विरोध केला. ग्रामसभेत फिल्म सिटीसाठी लोलयेच्या कोमुनिदादीने केलेला करार आणि मनोरंजन सोसायटीला दिलेला ना हरकत दाखला मागे घेण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामसभेत केली. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच निशा च्यारी होत्या.

फिल्म सिटीमुळे या भागातील जैवविवीधतेवर धोक्यात येण्याची शक्यता यावेळी डेनिस फर्नांडिस, मनोज प्रभूगांवकर, प्रशांत पागी, सांतान डिकॉसता व इतर ग्रामस्थांनी व्यक्त केली. काणकोणचे आमदार तथा सभापती रमेश तवडकर यांनी देखील लोकक्षोभाला सामोरे न जाता वन्य प्राणी व मनुष्यप्राण्यांच्या संरक्षणाचा विचार करावा असे मत मनोज प्रभूगांवकर यांनी ग्रामसभेत मांडले.

कोमुनिदादने भगवती पठारावरील १० लाख चौरस मीटर इतकी जमीन मनोरंजन सोसायटीला देण्याचा करार केलेला आहे. ग्रामसभेत हा ठराव चर्चेला आला तेव्हा ४४ विरूद्ध १६ मतांनी समंत करण्यात आला असला तरी सरपंचानी या संधीचा निर्णय घेण्यापूर्वी गावातील लोकांच्या हिताचा विचार करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली. या पंचायत क्षेत्रातील किनाऱ्यावर जाणाऱ्या बऱ्याच ठिकाणच्या पायवाटा बंद करण्यात आल्या असून त्या संबधी चौकशी करण्याची मागणी यावेळी नागरिकांनी केली.

# रिसॉर्टला लागलेल्या भीषण आगीत ६६ जणांचा मृत्यू

**अंकारा, दि. २१ :**



तुर्की येथे एका रिसॉर्टला लागलेल्या भीषण आगीत किमान ६६ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. तुर्की येथील पर्यटकांच्या पसंतीचे ग्रँड कार्टल हॉटेलला स्थानिक वेळेनुसार पहाटे साडेतीन वाजता आग लागली.आगीतून जीव वाचवण्यासाठी काहीजणांनी हॉटेलच्या खिडकीतून उड्या मारल्या.

आग लागल्यानंतर सुरुवातीच्या काही तासांतच १० जणांचा मृत्यू झाला होता, अशी माहिती तुर्की गृह मंत्रालयानं दिली आहे. आगीपासून जीव वाचण्यासाठी म्हणून दोन जणांनी हॉटेलच्या खिडकीतून उडी मारण्याचा प्रयत्न केला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला.हॉटेलला लागलेली आग विझवण्यासाठी १२ तास लागले. या घटनेसंदर्भात हॉटेल मालकासह चार जणांना अटक करण्यात आल्याची माहिती तुर्कीच्या न्याय मंत्र्यांनी दिली.या आगीचे व्हिडिओ तुर्कीत सर्वत्र शेअर केले जात आहेत. त्यात हॉटेलच्या खिडक्यांमधून कापड खाली लोंबकळत असल्याचं दिसतं आहे. आगीपासून जीव वाचण्यासाठी पेटलेल्या हॉटेलच्या खिडकीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी त्याचा वापर केला होता.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं की हॉटेलला आग लागली तेव्हा हॉटेलची मालकी असलेलं कुटुंब तिथेच होतं. आगीमागचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मात्र बोलू चे गव्हर्नर अबदुलअझिझ आयदिन म्हणाले की प्राथमिक माहितीनुसार, हॉटेलच्या चौथ्या मजल्यावर असणाऱ्या रेस्टॉरंटमध्ये ही आग लागली आणि तिथून ती हॉटेलच्या वरच्या मजल्यांमध्ये पसरली.आयदिन म्हणाले की त्या परिसरातील थंड हवामान यामुळे हॉटेलपर्यंत अग्निशमन दलाच्या गाड्या पोहोचण्यासाठी एक तासाहून अधिक वेळ लागला. तुर्कीतील आपत्कालीन सेवांनी २६७ कामगारांना घटनास्थळी पाठवलं आहे.हॉटेलमध्ये आग पसरताच हॉटेलमध्ये मुक्कामाला असणारे लोक, मुलं हॉटेलच्या रुममध्ये अडकले आहेत का याचा तपास करण्यात येत होता.

गृह मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या हॉटेलमधून बाहेर पडण्यासाठी दोन आपत्कालीन मार्ग होते. तर हॉटेलच्या एका कर्मचाऱ्यानं सांगितलं की त्यांनी ३०–३५ जणांना वाचवलं आहे.तुर्कीचे न्याय मंत्री यिलमाझ तुंक म्हणाले की आगीच्या घटनेचा तपास करण्यासाठी तपास यंत्रणा, सरकारी वकिलांना नियुक्त करण्यात आलं आहे.२०२४ मध्ये या हॉटेलची शेवटची तपासणी झाली होती. तुर्कीचे पर्यटन मंत्री म्हणाले की मंगळवारची घटना घडण्यापूर्वी या हॉटेलमध्ये आगीशी संबंधित सुरक्षेच्या बाबतीत कोणताही मुद्दा उपस्थित झाला नव्हता.

इस्तंबूल आणि तुर्कीची राजधानी असलेल्या अंकारातील स्कीअर्समध्ये बोलू डोंगर लोकप्रिय आहेत. सध्या तुर्कीमध्ये शाळांना दोन आठवड्यांची सुट्टी असल्यामुळे या हॉटेलमध्ये पर्यटकांची खूप गर्दी झाली होती.बोलू हे शहर तुर्कीच्या वायव्य भागात असून अंकारापासून ते जवळपास १७० किलोमीटर अंतरावर आहे.ही आग जरी फक्त एका हॉटेलला लागली असली तरी खबरदारीचा म्हणून शेजारचं एक हॉटेल रिकामं करण्यात आलं असल्याची माहिती गव्हर्नरने तुर्कीतील प्रसारमाध्यमांना दिली.हॉटेलमधील बाहेर काढण्यात आलेल्या पर्यटकांना बोलूच्या मध्यवर्ती भागात असलेल्या हॉटेल्समध्ये हलवण्यात आलं आहे.